# पोदार रुबाबदार

शैलेश जाधव



मुंबई विद्यापीठ आणि 'महाराष्ट्र टाइम्स' यांच्या वतीने युवा महोत्सवातील सर्वोत्कृष्ट कामगिरीसाठी दिल्या जाणाऱ्या मानाच्या चषकावर यंदा माटुंग्याच्या आर. ए. पोदार कॉलेजने आपले नाव कोरले. सर्वाधिक पदकांची लयलूट करत ५५ व्या युवा महोत्सवात पोदार कॉलेजने सर्वोत्तम कॉलेजचा मान पटकावला. या स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ मुंबई विद्यापीठाच्या फोर्ट संकुलातील सर कावसजी जहांगीर दीक्षांत सभागृहात पार पडला. यावेळी असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीच्या जनरल सेक्रेटरी डॉ. पंकज मित्तल यांच्या हस्ते पोदार कॉलेजच्या प्राचार्या डॉ. शोभना वासुदेवन यांनी विद्यार्थ्यांसोबत हा चषक स्वीकारला. महोत्सवातील द्वितीय सर्वोत्कृष्ट कॉलेजचा सन्मान मिठीबाई कॉलेजने, तर तृतीय क्रमांकाचे पारितोषिक वसईतील व्हिवा कॉलेजने पटकावला. विविध कॉलेजमधील विद्यार्थ्यांचा होणारा गौरव, कॉलेजांच्या नावाचा जयघोष याने सभागृह दणाणून गेले होते. मुंबई विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ. अजय भामरे, प्रभारी कुलसचिव सुनील भिरुड, 'महाराष्ट्र टाइम्स'चे निवासी संपादक समीर कर्वे, विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. सुनील पाटील, ५५व्या युवा महोत्सवाचे अध्यक्ष प्रा. महेशचंद्र जोशी, विद्यापीठाचे सांस्कृतिक समन्वयक निलेश सावे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा रंगला.